# जळगाव जिल्हयातील ग्रामीण व नागरी लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास

**प्रा. अरुण भबुतराव महाजन**
जय योगेश्वर माध्य. व उच्च माध्य. विद्यालय,
अमळनेर ता. अमळनेर जि. जळगांव

**प्रस्तावना :**

लोकसंख्येचे स्थानिक वितरण हा मानवी भूगोलातील सर्वात महत्वाचा विषय आहे. हे लक्षणीय महत्वाचे आहे, कारण मनुष्याने पृथ्वीच्या पृष्ठभागावर प्रचंड बदल घडवून आणला आहे. सध्या, मनुष्य हा पृथ्वीवरील पृष्ठभागाला अतिशय वेगाने बदलणारा सर्वात महत्वाचा शक्तिशाली भौगोलिक घटक आहे. मानवाची वैज्ञानिक आणि तांत्रिक कामगिरी चक्राकार उंचीवर पोहोचली आहे आणि आता काहीही त्याच्या आवाक्याबाहेर असल्याचे दिसत नाही. माणूस चंद्राच्या पृष्ठभागावर चालला आहे. वैज्ञानिक बौध्दिकौशल्याने साध्य करण्याच्या उंबरठयावर आहेत, जे जागतिक सभ्यतेमध्ये क्रांतिकारी बदल घडवून आणतील. हवामान बदलण्यासाठी माणसाकडे साधने आहेत. मानवाच्या प्रगतीमुळे ॲसिडचा पाऊस, ग्लोबल वार्मिंग, वातावरणातील प्रदुषण, ओझोन कमी होणे, आति थंड हिवाळा, अति उष्ण उन्हाळे झाले आणि त्याचे स्थानिक स्वरुप अत्यंत महत्वाचे आहे.

पृथ्वीच्या पृष्ठभागावर लोकसंख्येच्या वितरणाचे सर्वात उल्लेखनीय वैशिष्टे म्हणजे त्याचे असमान आणि अस्ताव्यस्त स्वरुप आणि उत्तर गोलार्धात त्याची एकाग्रता. लोकसंख्येची घनता नेहमी किनारपट्टीच्या मैदानावर आणि नदीच्या खोऱ्यात जास्त आढळते, जिथे माती सुपीक आहे आणि मुख्य अर्थव्यवस्था शेती आहे. हंटिंग्टनच्या मते मान्सूनच्या जमिनी आणि आशियाई देशांमध्ये लोकसंख्येच्या एकाग्रतेमध्ये एक संबंध आहे. जड उद्योग आणि वीज उद्योगांवर आधारित उद्योगांच्या घडामोडीमुळे या भागातील लोकसंख्येची एकाग्रता वाढली आहे. लोकांची मोठी गर्दी व्यापाराच्या क्रॉस-रोडवर देखील येते, ते समुद्री मार्गांच्या किनारपट्टीवर देखील असू शकतात. नैसर्गिक संसाधने असलेल्या जगातील अनेक क्षेत्रांनी लोकांना मूळ ठिकाणाहून स्थलांतराव्दारे आकर्षित केले आहे.

भारतातील ग्रामीण आणि शहरी लोकसंख्या स्वातंत्र्यानंतर म्हणजे सन १९५१ पासून २०११ पर्यंत शहरीकरणात बरीच वाढ झाली. सन १९५१ मध्ये १७ टक्के ऐवढी होती, तेव्हा पासून सातत्याने वाढणारी शहरी लोकसंख्या सन २०११ मध्ये ३१ टक्क्यांच्या वर जाऊन पोहोचली. शहरी लोकसंख्या वाढीचा दर (३१.८ टक्के) एकूण लोकसंख्यावाढीच्या दरापेक्षा (१७.६ टक्के) बराच जास्त आहे. ग्रामीण लोकसंख्यावाढीचा दर कमी म्हणजे १२.२ टक्के आहे. याचा अर्थ शहरी लोकसंख्या वाढत आहे आणि अधिक वेगाने वाढते आहे. आधी अस्तित्वात असणारी शहरे वाढतच आहेत, परंतु आणखी नवीन शहरेही उदयाला येत आहेत. या सर्वांचा अर्थ असा की, ग्रामीण भागातून शहरात होणारे स्थलांतर वाढते आहे. या आधारावर जळगाव जिल्हयातील ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येत झालेल्या बदला अभ्यास करण्यात येत आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

भौगोलिक दृष्टया अभ्यास क्षेत्र हे सातपुडा पर्वतरांगेच्या पायथ्याशी आहे. अभ्यासक्षेत्राचा अक्षवृत्तीय विस्तार २०द्धउत्तर ते २१द्ध उत्तर दरम्यान असून रेखावृत्तीय विस्तार ७४द्ध ५५द्व पूर्व ते ७६द्ध२८द्व पूर्व यादरम्यान आहे. अभ्यास क्षेत्राच्या उत्तरेस मध्यप्रदेश राज्य व सातपुडा पर्वत रांगा आहेत. ईशान्येस मध्यप्रदेश राज्यातील बऱ्हाणपूर जिल्हा, अग्नेयेस मुक्ताईनगर तालुका, दक्षिणेस भुसावळ, जळगाव, धरणगाव व अंमळनेर तालुके आहेत. पश्चिमेस धुळे जिल्हा आहे. अभ्यास क्षेत्राची दक्षिण सीमा तापी नदीने तर पश्चिम सीमा अनेर नदीने निश्चित केलेली आहे. अभ्यास क्षेत्रात तापी ही मुख्य नदी असून गुळ, रत्नावती, मोर, सुकी, अभोरा या तिच्या उपनद्या आहेत.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal — Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal — Impact Factor 4.94 — ISSN No. 2456-1665

**उद्दिष्टे :**

१) जळगाव जिल्हयातील तालुका निहाय ग्रामीण व शहरी लोकसंख्या अभ्यासणे.

२) जळगाव जिल्हयातील तालुका निहाय ग्रामीण व शहरी लोकसंख्येत झालेला बदल अभ्यासणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधात जळगाव जिल्हयातील तालुका निहाय ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येचा अभ्यास करण्यासाठी व्दितीय स्वरुपाची माहितीच्या आधारे मांडणी करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्र गॅझीटअर, जिल्हा सांख्यिकी अहवाल, सामाजिक आर्थिक सर्वेक्षण, भारतीय वार्षीक जनगणना अहवाल १९९१,२००१ व २०११ या साम्रगीचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच विविध लेखकांनी लोकसंख्या भूगोलावर लिहिलेल्या पुस्तकांचा वापर या शोध निबंधात करण्यात आलेला आहे.

$$\text{दशवार्षिक वाढ} = \frac{\text{चालू वर्षाची लोकसंख्या - मागील वर्षातील लोकसंख्या}}{\text{मागील वर्षातील लोकसंख्या}} \times 100$$


**ग्रामीण व नागरी लोकसंख्या :**

**तक्ता क्र. १ - जळगाव जिल्हयातील तालुका निहाय ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येतील दशवार्षिक बदल**

| तालुके | १९९१ | | २००१ | | २०११ | | १९९१-२००१ दशवार्षिक बदल (%) | | २००१ -२०११ दशवार्षिक बदल (%) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी |
| चोपडा | १८३५६१ | ४९२३४ | २१०९९८ | ६०८६५ | २४००३२ | ७२७८३ | १४.९ | २३.६ | १३.८ | १९.६ |
| यावल | १७५६८८ | ५००६३ | १९३०९९ | ५५४९७ | २०८९३४ | ६३३०८ | ९.९ | १०.९ | ८.२ | १४.१ |
| रावेर | २०८९२७ | ४१५९४ | २३९९११ | ४५३२५ | २६४४५९ | ४७६२३ | १४.८ | ९.० | १०.२ | ५.१ |
| मुक्ताईनगर | ११५३२३ | ० | १३७७५३ | ० | १६३४४४ | ० | १९.४ | ०.० | १८.७ | ०.० |
| बोदवड | ७०८५४ | ० | ७९१२६ | ० | ९१७९९ | ० | ११.७ | ०.० | १६.० | ०.० |
| भुसावळ | ७७६९२ | २०६६८८ | १२९५१५ | १९६०१२ | ११२७७५ | २४६६८६ | ६६.७ | -५.२ | -१२.९ | २५.९ |
| जळगाव | १६०७२१ | २४२१९३ | १८५१०७ | ३६८६१८ | २१५८१३ | ४६०२२८ | १५.२ | ५२.२ | १६.६ | २४.९ |
| एरंडोल | १०५७५८ | २७७३० | ११७९९४ | ३०१२० | १३५४५० | ३१०७१ | ११.६ | ८.६ | १४.८ | ३.२ |
| धरणगाव | ११३६८२ | ३२९७२ | १२१६४७ | ३३६२५ | १३८०७२ | ३५३७५ | ११.७ | २.० | १३.५ | ५.२ |
| अमळनेर | १६४८९० | ७६४४२ | १७६३८२ | ९१४९० | १९१८५५ | ९५९९४ | ३.७ | १९.७ | ८.८ | ४.९ |
| पारोळा | १२५२०८ | २९१९१ | १३५१२० | ३४७९९ | १५९११७ | ३७६६६ | ७.९ | १९.२ | १७.८ | ८.२ |
| भडगाव | १२७७२३ | ० | १४२१६८ | ० | १२५६७५ | ३७२१४ | ११.९ | ०.० | -११.६ | ०.० |
| चाळीसगाव | २५१८४८ | ७७४२० | २६५६९८ | ९१११० | ३०६६९८ | १०८१८१ | ५.५ | १७.७ | १५.४ | १८.७ |
| पाचोरा | १८६२९५ | ४११४२ | २०६५७४ | ४५३३३ | २२९८०८ | ५९८२० | १०.९ | १०.२ | ११.२ | ३२.० |
| जामनेर | २४४७९५ | ० | २८८८०४ | ० | ३०३१९५ | ४६७६२ | १८.० | ०.० | ५.० | ०.० |
| एकूण | २३१२९६५ | ८७४६६९ | २६२९८९६ | १०५२७९४ | २८८७२०६ | १३४२७११ | १३.७ | २०.४ | ९.८ | २७.५ |

स्त्रोत – जळगाव जिल्हा भारतीय जनगणना अहवाल -१९९१, २००१, २०११

**आलेख क्र. १ - जळगाव जिल्हयातील तालुका निहाय ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येतील दशवार्षिक बदल (%)**




जळगाव जिल्हयातील ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येच्या अभ्यासावरुन असे निर्दशनास येते की, सन १९९१-२००१ च्या दशवार्षिक बदलामध्ये या १० वर्षात भुसावळ तालुक्यातील ग्रामीण लोकसंख्येत (६६.७%) प्रचंड वाढ झालेली दिसत आहे. तसेच मुक्ताईनगर (१९.४%), जमानेर (१८.०%), जळगाव (१५.२%), चोपडा (१४.९%), रावेर (१४.८%), बोदवड (११.७%), धरणगाव (११.७%), एरंडोल (११.६%), भरडगाव (११.३%), पाचोरा (१०.९%), यावल (९.९%), पारोळा (७.९%), चाळीसगाव (५.५%) आणि अमळनेर (३.७%) या प्रमाणे अनुक्रमे ग्रामीण लोकसंख्येमध्ये दशवार्षिक बदल झाल्याचे आढळून आले तर सन १९९१-२००१ च्या दशवार्षिक बदलामध्ये जळगाव तालुक्यातील शहरी भागात (५२.२%) प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आले. तर चोपडा (२३.६%), अमळनेर (१९.७%), पारोळा (१९.२%), चाळीसगाव (१७.७%), यावल (१०.९%), पाचोरा (१०.२%), रावेर (९.०%), एरंडोल (८.६%) व धरणगाव (२.०%) या प्रमाणे अनुक्रमे वाढ झालेली निर्दशनास आली. तर भुसावळ शहरी भागात (-५.२%) मोठया प्रमाणात घट झाल्याचे आढळले. तसेच मुक्ताईनगर, बोदवड, भडगाव आणि जामनेर या तालुक्यात शहरी भाग नसल्याचे दिसून आले.

सन २००१-२०११ या दशवार्षिक बदलाच्या अभ्यासानुसार तालुका निहाय ग्रामीण लोकसंख्या अनुक्रमे मुक्ताईनगर (१८.७%), पारोळा (१७.८%), जळगाव (१६.६%), बोदवड (१६.०%), चाळीसगाव (१५.४%), एरंडोल (१४.८%), चोपडा (१३.८%), धरणगाव (१३.५%), पाचोरा (११.२%), रावेर (१०.२%), अमळनेर (८.८%), यावल (८.२%) व जामनेर (५.०%) या प्रमाणे लोकसंख्येत वाढ झाल्याचे दिसून येते. तर भुसावळ (-१२.९%) आणि भडगाव (-११.६%) या दोन्ही तालुक्यातील ग्रामीण लोकसंख्येत घट झाल्याचे दिसून आले. तसेच शहरी भागाच्या लोकसंख्येच्या अभ्यासावरुन अनक्रमे पाचोरा (३२.०%), भुसावळ (२५.९%), जळगाव (२४.९%), चोपडा (१९.६%), चाळीसगाव (१८.७%), यावल (१४.१%), पारोळा (८.२%), रावेर (५.१%), अमळनेर (४.९%) आणि एरंडोल (३.२%) या प्रमाणे वाढ झाल्याचे दिसून येते. तर मुक्ताईनगर, बोदवड, भडगाव व जामनेर या तालुक्यात शहरी भाग नसल्याचे दिसून आले.

**निष्कर्ष :**

१) सन १९९१-२००१ या १० वर्षात भुसावळ तालुक्यात ग्रामीण लोकसंख्यत (६६.७%) प्रचंड वाढ झालेली दिसून आली व या तालुक्यातील शहरी लोकसंख्येत (-५.२%) मोठया प्रमाणात घट झाल्याचे दिसून आले.

२) सन २००१-२०११ या १० वर्षात भुसावळ तालुक्यात ग्रामीण लोकसंख्यत (-१२.९%) प्रचंड घट झालेली दिसून आली व या तालुक्यातील शहरी लोकसंख्येत (२५.९%) मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आली.

३) सन १९९१-२००१ या १० वर्षात जळगाव तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येच्या तुलनेत शहरी लोकसंख्येत (५२.२%) मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आली.

४) सन १९९१ ते २०११ या २० वार्षाचा कालावधीत मुक्ताईनगर, बोदवड, भडगाव व जामनेर या तालुक्यात शहरी भाग नसल्याचे दिसून आले.

५) सन २००१-२०११ या १० वर्षात जळगाव जिल्हयातील ग्रामीण लोकसंख्येत घट दिसून आली व शहरी लोकसंख्येत वाढ झाल्याचे निर्दशनास आले आहे. तसेच सर्व तालुक्याच्या शहरी लोकसंख्येचा अभ्यासावरुन असे दिसून आले की कोणत्याही तालुक्यात घट झालेली नाही.

**संदर्भ ग्रंथ :**


१) प्रा. शेटे, फुले शहापूरकर लोकसंख्या भूगोल, अभिजीत पब्लीकेशन, लातूर

२) आर. सी. चान्दना, जनसंख्या भूगोल, कल्याणी पब्लिशर्स, नई दिल्ली

३) Chandna, R.C. (2002), Geography of Population: Concept, Determinants and Patterns, Fifth Edition, Kalyani Publishers, New Delhi.

४) Hassan Mohammad Izhar(2015),"Population Geography", Rawat Publications, Jawahar Nagar, Jaipur.

५) Kayastha S. L. (2014), "Geography of Population", Rawat Publications, Jawahar Nagar, Jaipur.

६) Patil S. B. (2008) "Geomorphology and settlement in Dhule district (M.S.)". Unpublished Ph.D. thesis submitted to North Maharashtra University Jalgaon.

७) Qazi, S. A. & Qazi, N. S. (2015), "Population Geography", A.P.H. Publishing Corporation, Ansari Road, Daryaganj, New Delhi.

८) Ranjit Tirtha (2010), Geography of India, Prem Rawat for Rawat Publications, Jawahar Nagar, Jaipur.

९) Rawat D. S. (2012), Demography Old and New, An encyclopedia, Vol-III, 'Making of Demography and Gerontology', cyber tech publication, New Delhi.

१०) Singh, I. (2006), "Population Geography", Alfa Publications, Ansari Road, Daryaganj, New Delhi.

११) District Census Handbook Jalgaon -1991, 2001, 2011

१२) जळगाव जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन -१९९१, २००१, २०११

१३) www.jalgaon.nic.in

१४) Gazetteer of India, Maharashtra State